दिवाळी विशेषांक २०२४ | अंक १५ वा

# मोडीदर्पण

संपादक : सुभाष लाड



₹ २५०/-

मोडी लिपी मित्र मंडळाचे मुखपत्र
# मोडीदर्पण
मोडी लिपीच्या संवर्धनाची चळवळ...
दिवाळी विशेषांक २०२४
पुष्प १५ वे

संपादक
**सुभाष लाड**

कार्यकारी संपादक
**विजय हटकर**

सहसंपादक
**सुनील कदम, दीपक नागवेकर, प्रकाश हर्चेकर
महेंद्र साळवी, विराज चव्हाण,**
मोडी विभाग - **पंकज भोसले**

मुखपृष्ठ
**अच्युत पालव**

कथा रेखाचित्रे
**विजयराज बोधनकर**

कथा स्पर्धा परीक्षक प्रमुख
**नारायण जाधव**

मुद्रितशोधन
**विराज चव्हाण**

संगणकीय मांडणी, सजावट
**प्रतिक कोठावळे, कोठावळे प्रेस, ठाणे
९८७०१७५३२३**

अर्थसंकलन
**गणेश चव्हाण, सुरेश राणे, रमेश काटकर, विजय बाराथे
अर्जुन नागरगोजे, प्रमोद मेस्त्री, चंद्रकांत खामकर**

प्रसिद्धी विभाग
**ॲड. पंकज लाड, प्रमोद पवार, दिगंबर शिंदे,
अमित खोत, विवेक मयेकर**

विशेष सहाय्य
**गणपत शिर्के, महादेव पाटील, आप्पा साळवी
किशोर नारकर, काका हाटले, सुहास बने, सुहास खामकर**

कार्यालय
**व्दारा श्री. सुभाष लाड
१, साईनाथ चाळ, गणेशनगर, पवई,
मुंबई ४०० ०७६
मोबा. ९८६९१०५७३४/ ८२७५२४८९५७**
subhashmlad@gmail.com

टपाल व जाहिरातीसाठी संपर्क
८८०६६३५०१७
vijaya.hatkar10@gmail.com

सहयोगी संस्था
राजापूर-लांजा तालुका नागरिक संघ, मुंबई
माझी मायभूमी प्रतिष्ठान, मुंबई
रणरागिणी लक्ष्मीबाई स्मारक ट्रस्ट, लांजा

**ISBN No.: 978-81-973418-1-6**

# अनुक्रमणिका

संपादकीय ........................................ ८

## मोडी विभाग

१) मोडीलिपीची अक्षर ओळख ........................................ १०
सुभाष लाड

२) पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे प्रशासन ........ २०
लेखक - सरस्वती देसाई ,हस्ताक्षर- अजय यादव

३) अहिल्याबाई होळकर यांच्या हस्ताक्षरातील पत्र १ ...... २७
लेखिका - इंद्रजा ब्रीद - मूळ पत्र

४) अहिल्याबाई होळकर यांचे पत्र २ ........................ ३१
लेखक - पंकज भोसले, हस्ताक्षर- पंकज भोसले

५) अहिल्याबाई होळकर यांचे पत्र ३ ........................ ३४
लेखक - आदित्य कान्हेरे, हस्ताक्षर - मूळ पत्र

६) स्त्री शक्ती अहिल्याबाई होळकर ........................ ३६
लेखक - अजय यादव, हस्ताक्षर अजय यादव

७) शौर्य धैर्य कर्तृत्वाची धरोहरा अहिल्याबाई होळकर ..... ४०
लेखक -ऐश्वर्या पवार , हस्ताक्षर - श्वेता फिरके

८) अहिल्याबाई नसत्या तर भारताचा इतिहास बदलला असता ४७
लेखिका - श्वेता फिरके, हस्ताक्षर - अजय यादव

९) अहिल्याबाई होळकर यांचा मुरूम शिलालेख ............ ४९
लेखक- अनिल दुधाने, हस्ताक्षर - श्वेता फिरके

१०) छत्रपती शिवाजी महाराजांची पॅरिस संग्रहातील बखर .... ५०
लेखक - सुनील कदम, हस्ताक्षर - सुनील कदम

## बोलीभाषा

११) कोकणी बोली ........................................ ५६
पुर्णिमा केरकर

१२) मराठीची एक प्रगत बोली मालवणी ........................ ६०
प्रा. डॉ. बाळकृष्ण लळीत

१३) कऱ्हाडे ब्राह्मण आणि त्यांची कऱ्हाडी भाषा .............. ६३
प्रा. डॉ. बाळकृष्ण लळीत

१४) चित्पावनी बोली ........................................ ६८
डॉ.विनायक बापट

१५) कोकणातील संगमेश्वरी बोली.................................. ७१
जे. डी. पराडकर

१६) रत्नबोली-तिल्लोरी ........................................ ७३
अरुण इंगवले

१७) दालदी बोली ........................................ ७५
प्रा. डॉ. निधी पटवर्धन

१८) आगरी बोली ........................................ ८०
चित्रकार मोरेश्वर पाटील

# चित्पावनी बोली





डॉ. विनायक बापट
चलभाष : ९७६४९७१२५६

भारत हा विविधतेने नटलेला देश असून भाषा हा त्याच्या विविधतेतील महत्त्वाचा घटक आहे. आठव्या परिशिष्टात समावेश असलेल्या अशा आज २२ भाषा भारतात आहेत, ज्यांना भारतातील अधिकृत भाषा म्हणून मान्यता आहे. या अधिकृत भाषा सोडून आज भारतात १५०० पेक्षा जास्त बोली भाषा बोलल्या जातात.हे आपल्या देशाचे भाषिक वैभव निश्चितच कौतुकास्पद आहे. एकमेकाच्या आकलन कक्षेतील ज्या बोली असतात त्यातील एखादी भाषा ही लेखन- वाचनाची भाषिक व्यवहारासाठी सातत्याने वापरली गेल्याने तिला प्रमाण भाषेचे स्वरूप प्राप्त होते व तिच्या कक्षेतील इतर भाषांना तिच्या बोलीभाषा असे म्हटले जाते. आजकाल भाषा वैज्ञानिक प्रमाण व बोली या संकल्पना नाकारू लागले असून प्रत्येक बोली ही स्वतंत्र भाषाच असते या अनुषंगाने तिचा विचार करू लागले आहेत.कारण कोणतीही बोली केव्हाही प्रमाण भाषेच्या निकषाला खरी उतरू शकते. बोलीभाषा या अनेक वर्षांपासून बोलल्या जात असल्याने त्या ज्या प्रदेशात बोलल्या जातात त्या प्रदेशातील प्रादेशिक वैशिष्ट्ये, लोक वैशिष्ट्ये, नैसर्गिक वैशिष्ट्ये, या सर्वांना आपल्यात सामावून व्यक्त होत असतात. बोलीच्या या विविध वैशिष्ट्यांमुळे आधुनिक काळात बोलीच्या शास्त्रशुद्ध अभ्यासाला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रमाण भाषा व तिच्या बोली असे आपण म्हणत असलो तरी व्याकरणिक दृष्ट्या अनेक बोली प्रमाण भाषेपेक्षा लक्षणीयरित्या वेगळ्या असतात. अनेक बोलीचा अभ्यास करता हे सहजतेने दिसून येते, त्यामुळे बोलीच्या अभ्यासात व्याकरणिक रचनेच्या अभ्यासाला विशेष महत्त्व प्राप्त होते.बोलीतील शब्द वैभव तेवढेच महत्त्वाचे असते. बोली या दररोजच्या वापरातील भाषा असल्याने अगदी जीवंत भाषा असतात. काळाच्या ओघात शब्दांच्या रूपांमध्ये या बोली भाषेत कसे बदल होतात व काही शब्द लुप्त कसे होतात व नवीन शब्द कसे स्वीकारले जातात याचा अभ्यास देखील औत्सुक्यपूर्ण ठरतो. काळाच्या ओघात आजपर्यंत अनेक भाषा लुप्त झाल्या आहेत. एखादी भाषा लुप्त होणे ही खूप दुर्दैवी गोष्ट ठरते कारण एखादी भाषा लुप्त झाली तर तिच्या सोबत कैक वर्षांचे सांस्कृतिक संचित देखील लुप्त होते. आज भारतातील अनेक बोली भाषा या लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळेच या भाषांचे संरक्षण व संवर्धन करणे ही काळाची गरज आहे अन्यथा खूप मोठे सांस्कृतिक वैभवाला आपण कायमचे मुकणार आहोत.

चित्पावनी बोली ही चित्पावन ब्राह्मणांची बोली भाषा. हे ब्राह्मण किमान दीड हजार वर्षां अगोदर पासून महाराष्ट्रातील रत्नागिरी परिसरात वास्तव करून असावेत असे सांगितले जाते. ते मुळात कुठून आले असावेत याबद्दल अनेक सिद्धांत मांडले गेले आहेत. ते आजच्या अफगाणीस्तानातून या ठिकाणी येऊन राहिले असावेत असे म्हटले जाते व अफगाणीस्थानात बोलवली जाणारी पश्तो व दारी या भाषा व चित्पावनी यात काही एक समानता असल्याचे सांगितले जाते अर्थात यासंदर्भात सखोल अभ्यास होण्याची आवश्यकता आहे.


दुसरा सिद्धांत असा मांडला जातो की हे लोक गुजरात-राजस्थान सीमेवरून स्थलांतरित होऊन या ठिकाणी येऊन स्थायिक झाले असावेत. चित्पावनीचे गुजराती भाषेशी साम्य मोठ्याप्रमाणात आहे.

माला ज्ञान मिळवेंचा से (चित्पावनी)

मने ज्ञान मेळववू छे. (गुजराती)
बाहेर मस्त निबर सें. (चित्पावनी)
बाहर आकरो ताप छे।(गुजराती)
रमेश कें न्हेसे ? (चित्पावनी)
रमेश क्या रहे छे।(गुजराती)

वर दिलेली वाक्ये पाहिल्यास हे साम्य आपल्या लक्षात येईल. विशेषतः क्रियापदाचा वर्तमानकाळ चालवताना गुजरातीतील 'छें' आणि चित्पावनीतील 'सें प्रत्यय वापरण्याची पद्धत लक्षात घेण्यासारखी आहे. त्यामुळे चित्पावन ब्राह्मण गुजरात- राजस्थान सीमा भागातून या ठिकाणी येऊन राहिले हा सिद्धांत जास्त योग्य वाटतो. अर्थात या संदर्भात देखील अजून अधिक संशोधन होण्याची आवश्यकता आहे. ही भाषा बोलणारे लोक मूळचे रत्नागिरी परिसरातील असले तरी आज या प्रदेशात ती भाषा बोलणारे एकही चित्पावनी कुटुंब सापडत नाही. भाषिक न्यूनगंडातून या परिसरातील चित्पावनी लोकांनी ही भाषा बोलणे सोडून बहुदा प्रमाण भाषा बोलणे सुरू केले असावे. अजूनही रत्नागिरी परिसरातील चित्पावन ब्राह्मण मराठी बोलताना सानुनासिक उच्चार मोठ्या प्रमाणात करतात यामागे ही त्यांची मूळ भाषा कारणीभूत असावी कारण चित्पावनीत बऱ्याच शब्दांचे उच्चार सानुनासिक केले जातात. क्यें, कितां, तेंचो, हेंचो, माथां, तुजां असे असंख्य सानुनासिक शब्द या भाषेत वापरले जातात. आज ही भाषा रत्नागिरी व कोंकण प्रदेशातून जरी नामशेष झाली असली तरी आजही ती गोव्यातील काही भागात तसेच उत्तर कर्नाटकातील उडुपी जवळच्या काही प्रदेशात बोलली जाते. या ठिकाणी चित्पावन ब्राह्मण काही शतकांअगोदर जाऊन स्थायिक झाले असावेत. ते आपल्या मूळ ठिकाणावरून जाताना आपल्या सोबत आपली भाषा देखील घेऊन गेले व तिची जपणूक देखील केली. अर्थात गोव्यात बोलली जाणारी चित्पावनी व उडुपी परिसरात बोलली जाणारी चित्पावनी यात थोडा फरक आहे. उडुपी परिसरातील चित्पावनीवर कन्नड भाषेचा बराच प्रभाव पडला आहे. या ठिकाणी आकडे कन्नडमध्ये सांगितले जातात. तसेच अनेक शब्द देखील कन्नड मधून या भाषेने घेतले आहेत उदाः 'तुला माहीत आहे का?' हे वाक्य गोमंतकीय चित्पावनीत 'तुला खबर सें का?' असे उच्चारले जाईल तर कर्नाटकी चित्पावनीत 'तुला गोंतू से का?' असे उच्चारले जाईल. या ठिकाणी 'गोंतू' हा शब्द कन्नड मधून आला आहे हे लक्षात येते. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.

चित्पावनी ही मराठीची बोली म्हणून गणली जात असल्याने. चित्पावनीचे मराठी संदर्भात तुलना करता लक्षात येणारे वेगळेपण या ठिकाणी नमुद करणे आवश्यक आहे.



मराठीतील आकारांत शब्द चित्पावनीत ओकारांत होतात. उदाः गेला-गेलो, राहिला-न्हेलो, आला-आयलो, मेला-मेलो खरेतर ओ चा उच्चार अधिक पसरट असल्याने तो 'ऑ' असा होतो त्यामुळे प्रत्यक्षात हे शब्द गेलॉ, आयलॉ, मेलॉ, अशा प्रकारे उच्चारले जातात.

मराठीतील झ या अक्षराचा उच्चार चित्पावनीत बरेचदा ज असा होताना दिसतो उदाः झालं-जालां, माझं-माजां, तुझं-तुजां, फणस-पणस इ. अर्थात फटाशी, फटकूर असे झ चा स्वतंत्र उच्चार असलेले अनेक शब्द चित्पावनीत आहेत.

चित्पावनीत मराठीच्या तुलनेत सुलभीकरणाची प्रक्रिया सहज होताना दिसते म्हणून मराठीत जोडाक्षरे वापरून लिहिलेले शब्द चित्पावनीत जोडाक्षर विरहित उच्चारले जातात. उदाः आम्ही- आमी, तुम्हाला-तुमला, माझ्याकडे- माथांन, ह्याच्याकडे- हेथांन किंवा हेचेकडा, मराठीतील ओकारांत असलेली क्रियापदे चित्पावनीत आकारांत होताना दिसतात. झाला- जालो, थांबला- थांबलो, भागला- भागलो, इ.

क्रियापदाचा वर्तमानकाळ चालवताना 'स' प्रत्यय लागतो.
में जासां, तू जासस, तो जासे, तो करसे,
अनुस्वारयुक्त 'ए' कारान्त शब्द चित्पावनीत 'आ' कारान्त होतात उदाः केळे-केळां, झाले- जालां, सगळे- सगळां, इ.

दररोजच्या वापरातील या भाषेतील शब्द कसे आहेत याचा आढावा घेतल्यास या भाषेचे स्वरूप समजून घेण्यास अधिक सोयीचे होईल.

कुठे- कें, होय- हय, केंव्हा- केडला, काय- कितां, इकडे- हेगडा, तिकडे- तेगडां, कुठला-केंचो, कुठून - केंथीन, मुलगा- बोडयो, मुलगी-चेड, आमटी- सांभारा, झाडणी-सळाथी, पळी- दवलो, झोप-नीद, ताप-जोर, सदरा- खोमीस, गाल-पोलो, उन्हाळा- गिम,इ.

काही क्रियापदे चित्पावनीत मराठीत लिहितात त्यापेक्षा वेगळ्या प्रकारे लिहिली जातात उदाः बोलणे- बोलणां, बोलायचं- बोलेचा, सांगणे- सांगेचा, विचारणे- विचारेचां, जायचं- जायवेचां, उचलायचं- उखलेंचा, बांधायचं- बांदेचा, मराठीत आज वापरात नसलेले किंवा मराठी शब्दांपासून अगदी वेगळे असलेले असे काही शब्द देखील चित्पावनीत आहेत उदाः निबर- ऊन, हातपुसणा फडका- सुडको, दोरीच्या आधाराने टांगलेली फळी- बळाणो, अंगण- गळां, काचेची बरणी- बुयांव, झाडणी- सळाथी, पक्कड- गावी, पाट- पिढां, इ.

चित्पावनीतील अनेक शब्द जुन्या काळातील ग्रंथ लीळाचरित्र किंवा ज्ञानेश्वरी या

ग्रंथातील शब्दांशी साधर्म्य सांगणारे आहेत.

उदाः लीळाचरित्र व चित्पावनी यातील साधर्म्य असलेले काही शब्द

| लीळाचरित्र | चित्पावनी. | मराठी |
|---|---|---|
| कैं. | कें. | कुठे |
| सुणां. | सुणां. | कुत्रा |
| दाईज. | दाईज. | वारसा |
| धुवा-पूत | धू-पूत. | कन्या-पूत्र |
| हिव. | हिव. | धोंडी |
| गोरूवें. | गोरवां. | गुरे |
| मुदी. | मुदी. | अंगठी |
| रीण. | रीण. | कर्ज |
| गाळी. | गाळी. | शिव्या |
| भवंडूनी. | भोवंडोनी. | फिरून |

### ज्ञानेश्वरी व चित्पावनी यात साम्य असलेले शब्द

| ज्ञानेश्वरी | चित्पावनी. | मराठी |
|---|---|---|
| आस्पद. | आस्थी. | संपत्ती |
| उतर. | उतर. | शब्द |
| ओखद. | ओखद. | औषध |
| खर. | खर. | तीक्ष्ण |
| खांदी. | खांदी. | फांदी |
| खालां. | खालां. | खाली |
| खोप. | खोप. | झोपडी |
| घाय. | घाय. | घाव |
| धाकुटा. | धाकुटा. | लहान |
| निबर. | निबर. | उन |
| चकाटा | चकाटा. | निष्फळ चर्चा |
| निंद. | निंद. | झोप |

यावरून जुन्या काळातील मराठी व चित्पावनी यात बरेच साम्य असल्याचे दिसते. काळाच्या ओघात मराठीतील अनेक शब्दांची रूपे बदलली अनेक शब्द मुख्य धारेच्या मराठीतून अस्तंगत झाले. परकीय भाषांमधून मराठीने अनेक शब्द स्वीकारले परंतु चित्पावनी या भाषिक परिवर्तनापासून काहीशी अलिप्त राहिल्यामुळे तिची जुनी रूपे अजूनही वापरतात असल्याची दिसतात.

चित्पावनीतील काही म्हणी देखील वैशिष्ट्यपूर्ण आहेत. आपण मराठीत 'घरोघरी मातीच्या चुली' ही म्हण वापरतो त्याच अनुषंगाने चित्पावनीत 'एका गोठ्ठेचिं गोरवां' ही म्हण वापरली जाते. एका चुकीला शिक्षा किती द्यायची? या संदर्भातील एक म्हण आहे. 'एक्का रागाला बावितु उड्डालां ते?' कोणी एक चूक केली म्हणून त्याला विहीरीत फेकायचा का? असा त्याचा अर्थ आहे.

'औराचा पाणी येसे तसां जरासे.' और म्हणजे पूर पूराचे पाणी येते तसे जाते. हे सांगणारी ही म्हण आहे. 'करव्वेला दादाशी खाल्लेला बोडयो काड्डवे नातुशी.' झाड लावायला आजोबा फळ खायला मुलगा आणि ते मोडलं की काढायला नातू जगाचं चक्र कसं असतं हे सांगणारी ही म्हण. 'गर्भीचा आणि मळभीचां सांगोनी येत नाही.'

जन्माला येणारं बालक आणि आकाशातून येणारा पाऊस हा कधी येईल हे सांगता येत नाही. जगात काही गोष्टी कधी कशा घडतील हे सांगता येत नाही हे सांगणारी ही म्हण. 'गांडी पळावनी पिढां देवव्हां' गांडी म्हणजे पार्श्वभाग हा शब्द जुन्या मराठीत असल्याचे दिसते. पिढां म्हणजे पाट. लायकी बघून मानसन्मान द्यावा हे सांगणारी ही म्हण.

घरापेक्षा पावठण मोठ्ठी. नाकापेक्षा मोती जड ही जी म्हण आपल्याकडे आहे त्याच अर्थाची ही म्हण आहे. 'घर सजवा सांकड बाईल सवी मांकड' सांकड म्हणजे अगदी व्यवस्थित. घर अगदी व्यवस्थित सुंदर असेल तर ते कोणालाही आवडतं पण बायको मात्र थोडी कुरूप असलेली बरी म्हणजे तिच्याकडे कोणाचं लक्ष जात नाही व त्यामुळे होणारे अनेक त्रास वाचतात. नित्याच्या अनुभवातून तयार झालेली ही म्हण असावी.

एकेकाळी अस्तंगत होण्याच्या वाटेवर असलेली चित्पावनी बोली आज गोव्यातील रहिवासी अशोक नेने यांच्यासारख्यांच्या प्रयत्नांतून पुन्हा लोकप्रिय होऊ लागली आहे. त्यांनी चित्पावनी शिकण्यासाठी सुलभ होईल अशी काही पुस्तके लिहिली आहेत. आज चित्पावनीत ललित लेखन देखील होऊ लागले आहे. कविता, कथा, ललित लेख, नाटके लिहिली जाऊ लागली आहेत. चित्पावनी गीतांचे संकलन देखील झाले आहे. काही विद्यार्थी या भाषेचा आपल्या प्रबंधासाठी भाषा वैज्ञानिक दृष्टीकोनातून अभ्यास करीत आहेत. चित्पावनीच्या संरक्षणाच्या आणि संवर्धनाच्या दृष्टीने हे आशादायक असे चित्र आहे. परंतु हे सर्व प्रयत्न अपुरे आहेत. मुळात जे लोक ही भाषा अजून बोलतात त्यांच्या पुढच्या पिढ्या देखील ही भाषा बोलत राहतील यादृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत. या भाषेच्या संवर्धनासाठी सरकारने अजून निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. आता मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे या दृष्टीने काही सकारात्मक कार्य होईल अशी आशा धरायला काही हरकत नाही.

**संदर्भ ग्रंथ**


१) चित्पावनी मार्गदर्शक - अशोक नेने
श्रीराज क्रियेशन्स
कडतरी, सोनाळ- गोवा. २०२१

२) सुलभ चित्पावनी- श्रीधर बर्वे
प्रकाशकः श्रीधर बर्वे, नानोडा- गोवा. २००८